# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील नागपूर शहराच्या मंजुर विकास
**{साप्रवि }** योजनेतील विविध आरक्षणाखाली जागा तसेच विकास योजना रस्त्याखालील जागा संपादन करण्याकरीता शासकीय सेवेतील भुसंपादन अधिनियमांतर्गत जमिन अधिग्रहणाबाबत अनुभवी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे संदर्भात जाहिरात क्रमांक : ४६१/पी.आर.दि. १२/०९/२०२४ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या श्री. प्रमोद भाऊराव गावंडे, "कंत्राटी भुसंपादन सल्लागार" यांना करार/कंत्राट पद्धतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरीता "कंत्राटी भुसंपादन सल्लागार" म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. आदेश क्र. १४७/ओ.ॲन्ड.एम. दि. २६/०९/२०२४ अन्वये श्री. प्रमोद भाऊराव गावंडे हे दि. ०३/१०/२०२४ रोजी भुसंपादन सल्लागार म्हणून नागपूर महानगरपालिकेतील नगर रचना विभागात रूजू झालेले आहेत. त्यांचा नियुक्ती कालावधी दि. २५/०३/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे "कंत्राटी भुसंपादन सल्लागार" यांच्या सेवेची नगर रचना विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. २७/०३/२०२५ पासून पुढील ६ महिन्याकरीता (दि. २६/०९/२०२५) पर्यंत मुदतवाढ देण्याचा व याकरीता अंदाजे रू. ६,४४,८९८/- इतका खर्च येणार असून, प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

टिप :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 21/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 15/04/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेतील विविध आरक्षणाखाली जागा तसेच विकास योजना रस्त्याखालील जागा संपादन करण्याकरीता शासकीय सेवेतील भुसंपादन अधिनियमांतर्गत जमिन अधिग्रहणाबाबत अनुभवी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे संदर्भात जाहिरात क्रमांक : ४६१/पी.आर.दि. १२/०९/२०२४ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या श्री. प्रमोद भाऊराव गावंडे, "कंत्राटी भुसंपादन सल्लागार" यांना करार/कंत्राट पद्धतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरीता "कंत्राटी भुसंपादन सल्लागार" म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. आदेश क्र. १४७/ओ.ॲन्ड.एम. दि. २६/०९/२०२४ अन्वये श्री. प्रमोद भाऊराव गावंडे हे दि. ०३/१०/२०२४ रोजी भुसंपादन सल्लागार म्हणून नागपूर महानगरपालिकेतील नगर रचना विभागात रूजू झालेले आहेत. त्यांचा नियुक्ती कालावधी दि. २५/०३/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे "कंत्राटी भुसंपादन सल्लागार" यांच्या सेवेची नगर रचना विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. २७/०३/२०२५ पासून पुढील ६ महिन्याकरीता (दि. २६/०९/२०२५) पर्यंत मुदतवाढ देण्याचा व याकरीता अंदाजे रू. ६,४४,८९८/- इतका खर्च येणार असून, प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**